राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

कालमर्यादा – १३/०१/२०२१
जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/जेसू/२०२१/९४२

दि. 08 JAN 2021

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

**विषय- महाराष्ट्र तंत्रनिकेतन,शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील अधिव्याख्याता व तत्सम , शासकीय तंत्रनिकेतने पदावरील अध्यापकांच्या जेष्ठतासूचीबाबत**

संदर्भ- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/ जेसू/२०२०/१६ दिनांक ०७/०१/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांच्या पत्राचे अवलोकन करुन आपल्या संस्थेतील अधिव्याख्याते व तत्सम पदावरील अध्यापकांची दि.३१/१२/२०२० पर्यंतची अचुक माहिती विहीत विवरणपत्रामध्ये **दिनांक १३/०१/२०२१ पुर्वी** व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करावी.

माहिती तयार करतांना ती Sakal Marathi font – New Microsoft Excel Worksheet आणि विवरणपत्राखालील दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन तयार करावी. तसेच माहितीची Softcopy est.ropune@gmail.com व desk4a@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावी.

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१३/ ४२४/ ४३४
ई-मेल- desk4a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ४अ/आस्था/जेसू/२०२०/९६ दिनांक:- 07 JAN 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय :- महाराष्ट्र तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील अधिव्याख्याता व तत्सम, शासकीय तंत्रनिकेतने पदावरील अध्यापकांच्या जेष्ठतासूचीबाबत.

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११

शासन सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांची जेष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे धोरण संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील अनु.क्र. ३ मध्ये जेष्ठतासूची तयार करणे व प्रसिध्द करणे या संदर्भात करावयाची कार्यवाही विषद केलेली आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयातील निदेशाचे पालन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियम ) नियम, १९८२ मधील तरतूदीनुसार, जेष्ठतासूची प्रत्येक वर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून प्रसिध्द करण्याची व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयातील निर्देश विचारात घेता आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमधील महाराष्ट्र तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील अधिव्याख्याता व तत्सम पदावरील अध्यापकांची दि.३१/१२/२०२० पर्यंतची माहिती सोबतच्या विवरणपत्रात आवश्यक त्या कागदपत्रांसह दि.१५/०१/२०२१ पर्यंत सादर करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# विवरणपत्र

| अ. क्र. | जेष्ठता क्रमांक | अध्यापकांचे नांव | विद्याशाखा | प्रवर्ग (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्म तारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष) | जेष्ठता दिनांक/ जेष्टतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्ती चा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

माहिती तयार करताना Sakal Marathi या Font चा वापर करावा अन्य कोणत्याही Font मध्ये माहिती पाठवू नये व माहिती Excel मध्ये सादर करावी.

एका अध्यापकाच्या माहितीसाठी एकच ओळ वापरावी. Multipal Lines मध्ये माहिती देवू नये. (Alt+Enter चा वापर करावा)

अध्यापकांचे संपूर्ण नाव देण्यात यावे

तारीख नमूद करताना DD-MM-YYYY या Format मध्ये नमूद करावी. तारीख नमूद करताना - शिवाय कोणतेही इतर चिन्ह (/, .) वापरू नये